# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक ११/१२/२०२० (शुक्रवार)

---

## गांज्या विक्रेत्यास अटक, ९,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

पोलीस ठाणे केळवद :— नागपूर ग्रामीण जिल्ह्यात अंमली पदार्थ विरोधी मोहिम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने दिनांक १०/१२/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक वरिष्ठांचे आदेशान्वये पोलीस ठाणे केळवद हद्दीत गस्तीवर असता इसम नामे रामराव शालीकराम दाते, वय ७२ वर्षे, रा. वार्ड क्र. ०१, केळवद हा आपले राहते घरी अंमली पदार्थ (गांज्या) बाळगुन गिऱ्हाईकांस विक्री करीत असल्याबाबत गोपनिय सुत्रांकडुन विश्वसणीय माहिती मिळाली. सदरची बातमी वरिष्ठांना अवगत करण्यात येवुन त्यांचे आदेशान्वये रामराव दाते याचे राहते घरी जावुन घरझडती घेतली असता घराचे बैठक खोलीत एका प्लास्टीक पिशवीमध्ये ८२२ ग्रॅम अंमली पदार्थ (गांज्या) किंमत ९,०००/— रू. चा मिळून आला. त्याचेकडुन सदरचे अंमली पदार्थ कायदेशिररित्या हस्तगत करुन त्यास अटक करण्यात आली असुन त्याचेविरूद्ध पोलीस ठाणे केळवद येथे अंमली औषधीद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ चे कलम २० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक श्री सुजितकुमार क्षिरसागर, सहा. पोलीस निरीक्षक जितेंद्र वैरागडे, पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र गौरखेडे, सहा. पोलीस उपनिरीक्षक बाबा केचे, पोलीस हवालदार चंद्रशेखर घडेकर, निलेश बर्वे, पोलीस नाईक सत्यशिल कोठारे, रोहन डाखोरे, चालक पोलीस नाईक अमोल कुथे यांनी यशस्वी केली.

टिप :— सदर कार्यवाहीचे छायाचित्र खालीलप्रमाणे.



पोलीस ठाणे केळवद एनडीपीएस कायद्यान्वये करण्यात आलेल्या कार्यवाहीचे छायाचित्र

## गोवंशीय जनावरांची अवैध वाहतुक

पोलीस ठाणे केळवद :— अंतर्गत दिनांक ०९/१२/२०२० रोजी २०.०० वा. ते २१.३० वा. दरम्यान मौजा सावळी फाटा ते बिहाडा फाटा शिवारात १२ चाकी कंटेनर क्र. आरजे ०९/जीए १९७२ चा चालक हा आपले वाहणामध्ये महाराष्ट्र राज्यात गोवंश हत्या बंदी असतांना कोणत्याही प्रकारचा जनावर वहातुकीचा परवाना व जनावर खरेदी पावती न बाळगता ५९ नग बैल—गोरे (गोवंशीय जनावरे) किंमत ०८ लाख ८५ हजार रु. यांची चारा पाण्याची व्यवस्था न करता अत्यंत क्रुरतेने कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन अवैध वाहतुक करतांना मिळून आला. सदर प्रकरणी वाहण चालक हा मोक्यावरून फरार झाल्याने घटनास्थळावरून गोवंशीय जनावरे व वाहणासह २८ लाख ०५ हजार रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन त्याचेविरूद्ध पोलीस ठाणे केळवद येथे कलम ४२९ भादंवि, सहकलम ११ (१),(घ),(ड) प्राण्यांना निर्दयतेने वागविने प्रति.अधि, १९६०, सहकलम ५(अ), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधि. १९९५, सहकलम ११९ महाराष्ट्र पोलीस अधि. १९५१, सहकलम १९२ (अ), १७९, १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास सहा. पोलीस निरीक्षक श्री पंकज वाघोडे हे करीत असुन आरोपीचा शोध सुरू आहे.

## फसवणुक

पोलीस ठाणे कोंढाळी :– अंतर्गत दिनांक ०६/१२/२०२० चे ०८.०० वा. ते १०/१२/२०२० चे ११.०० वा. दरम्यान १) श्रीमती पुष्पाबाई जगनराव अवथळे, वय ४८ वर्षे, रा. धामकुंड, २) गोपाल कालोकर, वय ६० वर्षे, रा. धामकुंड यांनी फिर्यादी दुर्गादास शालीकराम तभाने, वय ४७ वर्षे, रा. गोंडखैरी, ता. कळमेश्वर यांचे सोबत धनकुंड शिवारातील शेती विक्रीचा सौदा केला. त्यानंतर फिर्यादी यांचेकडुन ०७ लाख रुपये घेतले. परंतु सदरची शेती फिर्यादी यांना न देता दुसऱ्याच व्यक्तीला विकली. फिर्यादी यांनी शेतीबाबत विचारणा करून त्यांची रक्कम परत मागितली असता दोघांनीही त्यांना शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोलीस ठाणे कोंढाळी येथे श्रीमती पुष्पाबाई जगनराव अवथळे, गोपाल कालोकर यांचेविरूद्ध कलम ४२०, ५०४, ५०६, ३४ भादंवि अन्वये गुन्हा करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री देवेंद्र सोनावले हे करीत आहेत.

## अपघातात मृत्यु

पोलीस ठाणे नरखेड :– अंतर्गत दिनांक १०/१२/२०२० चे १९.०० वा. दरम्यान मोवाड येथिल महेंद्र किसना ढोरे व प्रभाकर तेलंगे हे आपले मोटार साकलने मोवाड येथुन नरखेड येथे जात असता मौजा बेलोना शिवारात पांढऱ्या रंगाच्या पिक अप गाडीच्या चालकाने आपले वाहण भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन त्यांचे मोटार सायकलला धडक मारून पळुन गेला. झालेल्या अपघातात महेंद्र किसना ढोरे हे गंभीर जखमी झाले असुन त्यांचे मोटार सायकलवर मागे बसलेले प्रभाकर तेलंगे हे जागीच मरण पावले. सदर प्रकरणी किसना गुलाबराव ढोरे, वय ७० वर्षे, रा. वार्ड क्र. ११, मोवाड यांच्या तक्रारीवरुन पांढऱ्या रंगाच्या पिक अप वाहणाच्या चालकाविरूद्ध पोलीस ठाणे नरखेड येथे कलम २७९, ३३७, ३०४(अ) भादंवि सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री खुटेमाटे हे करीत असुन आरोपी वाहण चालकाचा शोध सुरू आहे.